**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ७०/२०१७-१८/91 दिनांक: २६.०४.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. ७०/२०१७-२०१८**

श्री मदन उत्तमराव पाटील
मु.पो. बहे ता. वाळवा जि. सांगली : **तक्रार अर्जदार (ग्राहक**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग इस्लामपूर एक

**विरुध्द पक्षकार**

**कोरमः-** १.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी. व्ही. खपली, सदस्य सचिव,
३.श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर; खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

2614

१) प्रस्तुत प्रकरण तक्रारदारानी , अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली त्यांच्या दिनांक १९.०१.२०१८ निकालाने व्यथित होऊन दाखल केलेले आहे.

## तक्रारदारांची भूमिका

तक्रारदार श्री मदन उत्तमराव पाटील मु.पो. बहे, ता. वाळवा जि. सांगली हे सुशिक्षीत बेरोजगार असून त्याने त्यांच्या वडीलोपार्जित जमीनीमध्ये राईस मिल करिता व्यवसाय सुरु करण्याकरिता सर्व संबंधित खात्याची परवानगी घेऊन वि.प. यांचेकडे दिनांक ३०.०१.२०१७ रोजी नवीन विज जोडणी मागणीचा अर्ज दाखल केला. नियमानुसार अर्जदारास अर्ज दाखल केले तारखेपासून त्यास एक महिन्यांच्या आत येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक मिळणे आवश्यक होते. परंतु ते महावितरण कडून मिळाले नाही व त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष सांगली यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला असता उपकार्यकारी अभियंता उपविभागीय कार्यालय इस्लामपूर-१ यांच्या दिनांक १५.१२.२०१७अहवालानुसार ग्राहकांस नविन औद्योगिक विज कनेक्शन मंजूर करुन देण्यात यावे तसेच तशी कोणतीही योजना उपलब्ध नसल्यास तसे ग्राहकास कळवून त्यास Non DDF योजनेची माहिती देण्यात देऊन त्या योजने अंतर्गत कनेक्शन देणे संदर्भात मार्गदर्शन करावे, असा आदेश पारीत करण्यात आला. तक्रारदाराच्या कथनानुसार अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे निर्णयानुसार त्याला स्वत: खर्च करुन विज कनेक्शन घेणे शक्य नाही. त्यामुळे त्याला वि.प. कंपनीकडूनच वीज संचाची उभारणी करुन नवीन वीज कनेक्शन जोडून मिळावे व संबंधित अधिका-यानी कोटेशन देणे कामी केलेल्या हलगर्जीपणाची कार्यालयीन चौकशी करुन त्यांचेवर दंडात्मक कारवाई करावी व त्याचे झालेले आर्थिक नुकसान व भरपाई मिळावी अशी मागणी तक्रारदाराने केलेली आहे.

## वि.प. यांची भुमिका.

अर्जदार श्री मदन उत्तमराव पाटील यांनी नवीन औद्योगिक कनेक्शनसाठी दिनांक ३०.०१.२०१७ रोजी आपला अर्ज उपविभाग कार्यालय इस्लापमूर-१ येथे सादर केला. सदरचा अर्ज २४३ या जावक क्रमांकाने दिनांक ०९.०२.२०१७ रोजी शाखा कार्यालय नरसिंहपूर येथे सर्व्हेसाठी पाठवला होता. कनिष्ठ अभियंता शाखा कार्यालय नरसिंहपूर यांनी सदर ग्राहकाचा इस्लामपूर-१ सर्व्हे करुन अंदाजपत्रक मंजूरीसाठी पत्र क्र. SO/NPUR/T-७ Date २६.०५.२०१७ उपविभाग इस्लामपूर एक येथे मंजूरीसाठी पाठवले. सदरच्या ग्राहकास अंदाजपत्रकानुसार HT Line ०.०६ km. LT Line ०.०६ Km.DTC-१००KVA इतकी पायाभूत संचाची उभारणी करणे गरजेचे आहे. सदरच्या ग्राहकाच्या अर्जामध्ये Non DDF Stamp नसल्यामुळे तो जोडण्यासाठी शाखा अधिकारी व ग्राहक यांना सांगण्यात आले. सदर ग्राहकाने Non DDF Stamp देण्यात असमर्थता दर्शवली व सदरचे पायाभूत उभारणीचे काम महावितरण कंपनीने करावे असे उपविभाग इस्लामपूर एक येथे प्रत्यक्ष येऊन ग्राहकांने सांगितले. त्यानंतर सदरच्या ग्राहकाचे अंदाजपत्रक मंजूरीसाठी विभागीय कार्यालयास पत्र क्र. Dy.EE/ISL-१/OUT.NO./१५४० Date ०३.०८.२०१७ अन्वये पाठवण्यात आले. परंतु विभागीय कार्यालयाचा जावक पत्र क्र. EE/ISL/TECH/NO.४६९४ Date २२.०८.२०१७ नुसार त्या वेळी कुठलीही योजना नसल्यामुळे ते अंदाजपत्रक मंजूर केलेले नाही. विभागीय कार्यालयाच्या पत्रानुसार अर्जदारास याबाबत पत्र क्र. DY.EE/ISL-I/NO.३६५२ दिनांक ०६.०९.२०१७ नुसार कळविण्यात आले. त्यामुळे अर्जदारास आजपर्यन्त कनेक्शन देण्यात आलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दिनांक २६.०४.२०१८ रोजी घेण्यात आली. असता तक्रारदार स्वतः हजर होते. व विद्युत वितरण कंपनीतर्फे उपकार्यकारी अभियंता उपविभाग इस्लामपूर एक श्री प्रदिप व्ही. सुरवसे हजर होते.त्या दोघांनीही आपआपल्या पक्ष कथनानुसार युक्तिवाद सादर केले.

श्री सुरवसे यांचे कथनानुसार जेव्हा तक्रारदाराने तक्रार दाखल केली त्यावेळी नवीन औद्योगिक ग्राहकांसाठी विज जोडणी मंजूर करण्याकरिता कोणतीही योजना अंमलात नव्हती. सर्वसाधारणपणे नविन विज जोडणी कामी जर संच उभारणी संबंधी Infra structures आवश्यक असेल तर सदर संच उभारणी करिता त्यासाठी योजना अंमलात असणे आवश्यक असते, आणि अशा अंमलात असलेल्या योजने अंतर्गत विभागीय कार्यालयाच्या स्तरावर नवीन विज जोडणीचा अर्ज मंजूर होतो व त्यानंतर येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक तयार गेले जाते व अर्जदारास दिले जाते जर अशी कोणतीही योजना आस्तित्वात नसेल तर अर्जदारास Non DDF योजने अंतर्गत संच उभारणीचा खर्च स्वतः करुन विज जोडणी घेऊन नंतर खर्चाची परिपूर्ती मागणीचा विकल्प दिला जातो, आणि तो विकल्प अर्जदाराने स्विकारल्यास त्यास विज जोडणी दिली जाते. तक्रारदारास सदरचा विकल्प देण्यात आला होता. परंतु त्याच्या अडचणीमुळे तक्रारदाराने तो विकल्प स्विकारला नाही. म्हणून त्यास आज पर्यन्त नवीन औद्योगिक वीज पुरवठा देण्यात आलेला नाही. तथापि नुकतीच Infra future नावाची योजना मंजूर करण्यात आली असून त्या योजने अंतर्गत तक्रारदाराचा नविन विज जोडणी अर्ज मंजूर करण्यात आला असून दिनांक २३.०४.२०१८ रोजी कोटेशन देण्यात आले आहे. तक्रारदाराने कोटेशनची रक्कम भरल्यानंतर त्यास विहीत मुदतीत संच उभारणी करुन त्यास विज जोडणी देण्यात येत आहे. श्री प्रदिप व्ही सुरवसे हयांनी सदरची वीज जोडणी कोटेशनची रक्कम तक्रारदाराने भरल्यानंतर विहीत मुदत म्हणजे ३ महिण्यात देण्यात येईल. असे या मंचासमोर कबूल केले आहे .

तक्रारदाराने सदरचे कोटेशन मिळाले असल्याचे कबूल केले व त्या कोटेशनची रक्कम १५ दिवसांत वि.प.कडे भरत असल्याचे प्रतिपादन केले आणि श्री सुरवसे हयांचे प्रतिपादनानुसार , जर ३ महिन्याचे आंत त्यास नविन विज जोडणी मिळत असेल तर हया अर्जातील नविन विज जोडणीचे मागणी ते सोडून देत आहेत. तथापि कोटेशन देण्यात झालेल्या विलंबाबाबत भरपाईची मागणी ते लावून धरत आहे.असे प्रतिपादन केले.

महाराष्ट्र विज नियामक आयोग (वितरण परवाना धारकाच्या कृतीची मानके व विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम -२०१४ च्या परिशिष्ट 'अ ' मधील कलम (२) अनुसार अर्जदाराने अर्ज सादर केले पासून त्याने करावयाच्या संबंधी त्यास कळविण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे व त्या कालावधीत तशी कारवाई न झाल्यास ठोस स्वरुपाची भरपाई नमूद केलेली आहे. प्रस्तुतचे प्रकरण ग्रामिण क्षेत्रात विज पुरवठा मागणी केलेल्या ग्राहकास वीज पुरवठा देणेचा आहे व त्या विज जोडणी करिता संचाची उभारणी करणे आवश्यक आहे.ही बाब उभय पक्षकारानी मान्य केलेली आहे. त्यामुळे कृतीमानकानुसार कोटेशन देण्याची मुदत अर्जाचे तारखेपासून ३० दिवसाचे आंत अशी विहीत करणेत आली आहे. कोणत्याही कारणास्तव /परिस्थितीत सदरची विहीत मुदत शिथिल करण्याचे प्रावधान त्यात नाही . त्यामुळे वि.प. नी झालेल्या विलंबाकरिता जे काही स्पष्टीकरण आपल्या लेखी कथनामध्ये किंवा युक्तिवादामध्ये दिलेले आहे त्याचा विचार या मंचाला करता येत नाही. सदर कृती मानकाचे कलम ११.१ मध्ये नमूद केलेली कोणतीही परिस्थिती या प्रकरणी होती व त्यामुळे तक्रारदारास अंदाजपत्रक देता येऊ शकले नाही किंवा नवीन औद्योगिक विज पुरवठा देता येऊ शकला नाही, अशी वि.प. ची केस नाही. त्यामुळे हया संपूर्ण प्रक्रियेत झालेला विलंब माफ करता येत नाही. त्यामुळे तक्रारदार कृती मानकात नमूद केलेनुसार भरपाईस पात्र आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

आम्ही हे नमूद केलेले आहे की, श्री सुरवंसे यांनी तक्रारदाराने कोटेशनची रक्कम भरल्यानंतर ३ महिन्यात तक्रारदारास नवीन वीज पुरवठा देण्यात येईल व त्यास अर्जदारने मान्यता दिली. सबब हया तडजोडीनुसार आम्ही खालील आदेश पारित करत आहोत.

## आदेश

१) तक्रारदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदारास अर्ज दाखल केले तारखेपासून म्हणजे दिनांक ३०.०१.२०१७ पासून दिनांक २३.०४.२०१८ पर्यन्त कोटेशन देण्यात झालेल्या विलंबा करिता दिनांक ३०.०१.२०१७ ते पुढील ३० दिवसांत म्हणजे दिनांक ०२.०३.२०१७ पर्यन्तचा कालावधी सोडून पुढे झालेल्या विलंबाकरिता प्रति आठवडा १०० रु. प्रमाणे ५९ आठवडयाकरिता रक्कम रु. ५,९००/- इतकी भरपाई या आदेशाचे तारखेपासून एक महिन्याच्या आत द्यावी.वि.प.च्या व तक्रारदाराच्या वर नमूद केलेल्या संयुक्त विधानानुसार, नवीन वीज जोडणीचा आदेश पारीत करण्यात येत नाही.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

26/4/18 26/4/18 26/4/2018

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण